हात. वाटेत सतरंजीपुरा झोन कार्यालयासमोर रस्ता गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
दुभाजकाजवळ, दहिबाजाराकडून येणाऱ्या

# कार्यालय नगरपरिषद, काटोल

## जि. नागपूर - ४४१३०२


Phone & Fax : 07112222593, 07112222101
Toll Free No.- 18008430443

Email Id- n.p.katol@gmail.com
WebSite- nagarparishadkatol.org


क्र. नपका/आस्था/१५३/२०२४-२५

दि. २४/०२/२०२५

# जाहीर प्रगटन

काटोल नगरपरिषद हद्दीतील सर्व नागरीकांना कळविण्यात येते की, राज्यातील पात्र व्यक्तींना पारदर्शक, कार्यक्षम व समयोचित लोकसेवा देण्याकरिता तसेच लोकांच्या स्थानिक प्रशासनाकडून वाढत्या अपेक्षा विचारात घेऊन त्यांना तत्पर व दर्जेदार सेवा पुरविण्याच्या दृष्टिकोनातून महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश २०१५ दि. २८/०४/२०१५ रोजी लागू करण्यात आला आहे.

त्यानुसार काटोल नगरपरिषद क्षेत्रातील पात्र नागरिकांना तत्पर व दर्जेदार सेवा पुरविण्याच्या दृष्टीने काटोल नगरपरिषद कार्यालयामार्फत पुरविण्यात येणाऱ्या ६४ लोकसेवा अधिसुचित करण्यात येत आहेत. अधिसुचित सेवांची अंमलबजावणी करणारे पदनिर्देशित अधिकारी, तसेच या सेवा वेळेवर न पुरविल्यास त्यावर नियंत्रण ठेवण्याच्या दृष्टीने प्रथम अपिलीय अधिकारी व द्वितीय अपिलीय अधिकारी आणि विहीत कालमर्यादा अधिसुचित करून जाहीर प्रगटन करण्यात येत आहे. तरी वरील ६४ लोकसेवांची तपशीलवार माहिती नगरपरिषद कार्यालय, काटोलच्या नोटीस बोर्डवर प्रसिद्ध करण्यात आली आहे. सबब सर्व नागरिकांनी नोंद घ्यावी.

शिक्का

स्वा/-
मुख्याधिकारी,
नगरपरिषद, काटोल.